स्थापना २०१८
# जल फाउंडेशन कोकण विभाग (रजि.)
महाराष्ट्र राज्य – मुंबई
(नोंदणी क्रमांक : २०७/२०१८ – जी.बी.बी.एस.डी. मुंबई महाराष्ट्र)
कार्यालय : जय बजरंग सोसायटी, जय मल्हार नगर, खंडोबा टेकडी, घाटकोपर (पश्चिम), मुंबई – ४०० ०८६.
संपर्क : +९१ ९९३०६ ८८८१६ / ७०४५४ ५६६७६

Date: Sep 09, 2023

MP GOPAL SHETTY
Public Relation Office
Date 9/9/23 Time
Sign.

To,
Hon. Shri. Gopal Shetty Saheb
Member of Parliament (Mumbai North)

**Subject : Restoration of halts of 10105/10106 Sawantwadi ↔ Diva Express as travel time has not reduced after dropping many halts**

Respected Sir,

The Ministry of Railways converted the 50105/50106 Sawantwadi Diva Passenger train into an Express service in 2020 as a part of Zero Based Time Table activity. Central Railway removed 11 intermediate stops, and Konkan Railway removed 7 stops to achieve this, resulting in a total reduction of 18 halts. This significant reduction in stops was expected to yield time savings of at least 100 minutes. Both the Ministry of Railways and the Railway Board had promised a reduction in travel time as a result of these changes. However, despite these efforts, the travel time for the train remains nearly the same as per the schedule and, in some cases, has even increased during its actual runs. Central Railway's decision to provide stoppages at Apta and Jite instead of Pen and Nagothane is a topic of research.

| Train No. and Name | Non Monsoon Time Table | | Monsoon Time Table | |
|---|---|---|---|---|
| | Travel Time as Passenger Train | Travel Time as Express Train | Travel Time as Passenger Train | Travel Time as Express Train |
| 10105 Diva Sawantwadi Express | 12 hrs 10 mins | 11 hrs 50 mins (Reduced by mere 20 mins) | 11 hrs 50 mins | 12 hrs 05 mins (Increased by 15 mins) |
| 10106 Sawantwadi Diva Express | 11 hrs 40 mins | 11 hrs 30 mins (Reduced by mere 10 mins) | 11 hrs 40 mins | 11 hrs 55 mins (Increased by 15 mins) |

The Zero Based Time Table activity, in retrospect, has not yielded the anticipated benefits for any region, as the railway department has begun to reverse some of the decisions made during this exercise. This reversal has come in response to criticism from stakeholders, particularly passengers.

We kindly request that you follow up with the Ministry of Railways to consider **reinstating the halts for the 10105/10106 Sawantwadi ↔ Diva** train at various stations, including **Kolad, Indapur, Diwankhavti, Anjani, Kamthe, Ukshi, and Bhoke** on the Konkan Railway route, as well as **Pen and Nagothane** on the Central Railway route. Furthermore, we would like to propose the addition of new halts at **Kalambani Budruk and Kadvai** along the Konkan Railway route to enhance connectivity and convenience for passengers.

श्री नितीन सखाराम जाधव
संस्थापक अध्यक्ष

श्री रविंद्र सुरेश निकम
सचिव

श्री अतिश जानू गोठल
खजिनदार

जल फाउंडेशन - कोकण विभाग, नोंदणी क्रमांक: २०७/२०१८ जी.बी.बी.एस.डी. मुंबई (रजि.)

स्थापना २०१८
# जल फाउंडेशन कोकण विभाग (रजि.)
पाणी हेच जीवन आहे
महाराष्ट्र राज्य – मुंबई
(नोंदणी क्रमांक : २०७/२०१८ – जी.बी.बी.एस.डी. मुंबई महाराष्ट्र)
कार्यालय : जय बजरंग सोसायटी, जय मल्हार नगर, खंडोबा टेकडी, घाटकोपर (पश्चिम), मुंबई – ४०० ०८६.
संपर्क : +९१ ९९३०६ ८८८१६ / ७०४५४ ५६६७६

दिनांक: ०९ सप्टेंबर, २०२३

प्रति,
मा. श्री. गोपाळ शेट्टी साहेब
खासदार (उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघ)

विषय : पॅसेंजरची एक्सप्रेस झाल्यानंतरही प्रवास वेळेत काहीच फरक न पडल्यामुळे १०१०५/१०१०६ सावंतवाडी दिवा एक्सप्रेसचे थांबे पूर्ववत करणेबाबत

आदरणीय महोदय,

२०२० मध्ये शून्य आधारित वेळापत्रकात रेल्वे मंत्रालयाने ५०१०५/५०५०६ सावंतवाडी दिवा पॅसेंजरचे मध्य रेल्वे वरील ११ आणि कोंकण रेल्वेवरील ७ असे एकूण १८ थांबे कमी करून एक्सप्रेसमध्ये रूपांतर केले. एका थांब्याला ८ ते १० मिनिटे या रेल्वे मंत्रालयाच्या गणितानुसार एवढे घाऊक प्रमाणात थांबे कमी केल्यानंतर प्रवास वेळेत किमान १०० मिनिटांची घट अपेक्षित होती. परंतु, या गाडीच्या प्रवास वेळेत कागदावर अवघी १० ते २० मिनिटांची घट तर झाली पण प्रत्यक्षात मात्र अजूनही तेवढाच वेळ लागतो. मध्य रेल्वेने पेण आणि नागोठणे वगळून आपटा आणि जिते येथे थांबे का दिले हा संशोधनाचा विषय ठरेल.

| गाडी क्रमांक व नाव | नियमित वेळापत्रक | | पावसाळी वेळापत्रक | |
|---|---|---|---|---|
| | पॅसेंजर असताना प्रवास वेळ | एक्सप्रेस झाल्यावर प्रवास वेळ | पॅसेंजर असताना प्रवास वेळ | एक्सप्रेस झाल्यावर प्रवास वेळ |
| १०१०५ दिवा सावंतवाडी एक्सप्रेस | १२ तास १० मिनिटे | ११ तास ५० मिनिटे (केवळ २० मिनिटे कमी) | ११ तास ५० मिनिटे | १२ तास ०५ मिनिटे (१५ मिनिटे वाढ) |
| १०१०६ सावंतवाडी दिवा एक्सप्रेस | ११ तास ४० मिनिटे | ११ तास ३० मिनिटे (केवळ १० मिनिटे कमी) | ११ तास ४० मिनिटे | ११ तास ५५ मिनिटे (१५ मिनिटे वाढ) |

शून्य आधारित वेळापत्रक देशाच्या कोणत्याही भागासाठी लाभदायक ठरलेले आहे असे दिसत नाही. प्रवाशांनी प्रखर विरोध केल्यामुळे रेल्वे मंत्रालयाने यातील बरेचसे बदल पूर्ववत करण्यास सुरुवात केली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्शवभूमीवर हे गरजेचेच आहे.

१०१०५/१०१०६ सावंतवाडी दिवा एक्सप्रेसला कोंकण रेल्वे मार्गावर कमी केलेले कोलाड, इंदापूर, दिवाणखवटी, अंजनी, कामथे, उक्षी आणि भोके तर नव्याने निर्माण झालेले कळंबणी बुद्रुक आणि कडवई येथे तर मध्य रेल्वेवर पेण आणि नागोठणे येथे थांबे देण्यात यावेत यासाठी आपण रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा, ही नम्र विनंती.

श्री नितीन सखाराम जाधव
संस्थापक अध्यक्ष

श्री रविंद्र सुरेश निकम
सचिव

श्री अतिश जानू गोठल
खजिनदार

जल फाउंडेशन-कोकण विभाग नोंदणी क्रमांक: २०७/२०१८ जी.बी.बी.एस.डी. मुंबई (रजि.)

पाणी हेच जीवन आहे.
Email : jalfoundation2018@gmail.com / Facebook : jalfoundation